महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) टपाल परिपत्रक /९२ /२०२३, मुंबई, दिनांक १८ /०७/२०२३

**संदर्भ :-** १) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.संकिर्ण-२०२३/ प्र.क्र.०२/१८(र.वका.),दिनांक ०२.०२.२०२३
२) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, परिपत्रक क्र.संकिर्ण-०६२३/ प्र.क्र.४७/ आस्था-३, दिनांक २६.०६.२०२३.

**विषय :-** गृह विभागाअंतर्गत क्षेत्रिय कार्यालयांकडून ई-ऑफिस प्रणाली अंमलबजावणी करणे व टपाल ई-ऑफिस प्रणाली व्दारे स्विकारणेबाबत.

******

**परिपत्रक**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. संकिर्ण-२०२३/ प्र.क्र.०२/१८(र.वका.), दिनांक ०२.०२.२०२३ अन्वये ई-ऑफिस प्रणालीचा वापर प्रभावीपणे करणेबाबत सुचित करण्यात आले आहे. त्यानुसार, महाराष्ट्र पोलीस दलाच्या कार्यालयांमध्ये ई-ऑफिस प्रणाली प्रभावीपणे कार्यान्वीत करावयाची आहे.

त्याअनुषंगाने, पोलीस महासंचालक कार्यालयातील नोंदणी शाखेत (का.क्र.३८) ई-ऑफिस प्रणालीव्दारे टपाल आवक-जावक कामकाज सुरु करण्यात आले असून, **राज्यातील सर्व पोलीस घटक कार्यालयांकडून पोलीस महासंचालक कार्यालयात येणारे टपाल (Negative list मधील कागदपत्रें वगळता) दि.१५.०८.२०२३ पासून केवळ ई-ऑफिस प्रणालीच्या माध्यमातूनच स्विकारण्यात येणार आहे.** ई-ऑफिस प्रणाली व्यतिरिक्त अन्य कुठल्याही माध्यमाव्दारे टपाल स्विकारणे बंद करण्यात येणार आहे.

राज्यातील पोलीस घटक कार्यालयांकडून पोलीस महासंचालक कार्यालयास पाठवावयाचे टपाल ई-ऑफिस प्रणालीच्या माध्यमातून पाठविण्याकरिता संबंधीत घटक प्रमुखांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

१. ई-ऑफिस प्रणाली व्दारे कामकाज करणेकरिता अधिकारी/ कर्मचा-यांचे Name Based शासकीय ईमेल आयडी (gov.in/mahapolice.gov.in/nic.in/mah.gov.in या डोमेनवरील) आवश्यक आहेत. तसेच, अधिकारी/ कर्मचा-यांचा Employee Master Data ची आवश्यकता आहे.

२. त्याअनुषंगाने, पोलीस घटक कार्यालयाचे कार्यालय अधीक्षक/ प्रशासकीय अधिकारी, तसेच कार्यालयाच्या नोंदणी शाखेत नेमणूकीस असलेल्या दोन अधिकारी/ कर्मचा-यांचे शासकीय ईमेल आयडी तयार घ्यावयाचे असून, त्याकरिता आवश्यक माहिती यासोबत जोडलेल्या विहीत नमून्यात (Annexure- A) मध्ये सादर करावी.



Scanned with CamScanner

३. त्याचप्रमाणे, पोलीस घटक कार्यालयाचे कार्यालय अधीक्षक/ प्रशासकीय अधिकारी, तसेच कार्यालयाच्या नोंदणी शाखेत नेमणूकीस असलेल्या दोन अधिकारी/ कर्मचा-यांच्या **Employee Master Data** बाबतची माहिती यासोबत जोडलेल्या विहीत नमून्यात **(Annexure- B)** मध्ये सादर करावी.

उपरोक्तप्रमाणे सादर करावयाची माहिती **English** व **Excel Format** मध्ये या कार्यालयास **compcell.dgoffice@mahapolice.gov.in** या ईमेल वर **दिनांक- १९/०७/२०२३** रोजीपर्यंत प्राधान्याने सादर करावयाची आहे.

(निसार तांबोली)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

**प्रति,**

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, लोहमार्ग व दहशतवाद विरोधी पथक महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती / प्रशिक्षण व खास पथके/ रा.रा.पो. बल/वाहतूक/ फोर्स वन / आर्थिक गुन्हे /नागरी हक्क संरक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक (महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग/ सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई/मोटार परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह)
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
सहसंचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९
सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.०१ ते ४४



Scanned with CamScanner

# Annexure A

## Format for Creation of Name Based Official Email IDs

| Sr.No. | First Name | Last Name | Designation | Mobile Number | Preferred Email ID | Date of Birth | Date of Retirement | Sevarth ID |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

Scanned with CamScanner

# Annexure B

## Employee Master Database Format for Eoffice

| Sr. No. | Title | FULL NAME OF EMPLOYEE | Gender | Designation of employee * | Email * | UID Number */Adhar No | Employee Code */ Sevarth ID | Post Name/ Charge post name (In case of additional charge) | Name of Organization unit* / Desk No. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

| Abbreviation of POST / Head Of the Desk | Name of Reporting Officer | Designation of Reporting Officer | Organisation Unit of Reporting Officer | Date of Birth (dd-mm-yyyy) | Joining Date of Service (dd-mm-yyyy) | Date of Retirement (dd-mm-yyyy) | Present Address Details | Mobile Number |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

Scanned with CamScanner